RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना/पळचिल/पोलादपूर/रद्द आदेश/२०२० दिनांक : २३/०६/२०२०.

वाचले:-

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०
७. तहसिलदार पोलादपूर यांजकडील पत्र क्र.फौजदारी/कात.४/कोविड/२०२०, २४/०५/२०२०
८. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या/ब-५/करोना/पळचिल/पोलादपूर/२०२०, दि.२६/०५/२०२०.
९. तहसिलदार पोलादपूर यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-२/करोना/पळचिल/पोलादपूर/कंटेनमेंट झोन रद्द/२०२०, दिनांक २२/०६/२०२०.

---

**आदेश,**

ज्याअर्थी, रायगड जिल्हयातील पोलादपूर तालुक्यातील खाली नमूद यादीमधील ठिकणी कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, सदरचे क्षेत्र त्यासमोर नमूद दिनांकापासून या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.८ कडील आदेशान्वये Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**मौजे पळचिल, ता.पोलादपूर येथील कोरोना बाधित व्यक्ती रहात असलेला परिसर व त्यालगतचा परिसर (दत्ताराम शंकर जाधव, गणेश सकपाळ, रविंद्र भिकू सकपाळ, गणेश काशिराम जाधव यांचे घराचा परिसर) हे क्षेत्र/परिसर.**

ज्याअर्थी, उपरोक्त Containment Zone मधील रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आल्याबाबत व शेवटचा रुग्ण बरा होऊन कंटेनमेंट झोनचा २८ दिवसांचा कालावधी पुर्ण झाल्याबाबत व आजमितीस एकही नविन रुग्ण आढळून आलेला नसल्याने सदर Containment Zone रद्द करण्याबाबत तहसिलदार पोलादपूर यांनी दि.२२/०६/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी, वरील वस्तुस्थिती व तहसिलदार पोलादपूर यांचे दि.२२.०६.२०२० चे पत्र विचारात घेता, मौजे पळचिल, ता. पोलादपूर, जि. रायगड येथील कोरोना बाधीत रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्याने. तसेच या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या अन्य व्यक्तीही आद्याप पर्यंत कोरोना विषाणू मूळे संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले, **मौजे पळचिल, ता.पोलादपूर येथील कोरोना बाधित व्यक्ती रहात असलेला परिसर व त्यालगतचा परिसर (दत्ताराम शंकर जाधव, गणेश सकपाळ, रविंद्र भिकू सकपाळ, गणेश काशिराम जाधव यांचे घराचा परिसर) हे क्षेत्र/परिसर Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
Collector Raigad-Alibag

सही/--
(निधी चौधरी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड

प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी महाड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार पोलादपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी पोलादपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलादपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पोलादपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, पोलादपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड